कायम विना अनुदानित


**पुणे जिल्हा परिषद,पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**


**जा.क्र.जिप/शिक्षण /प्राथ/२/२१/१०४ /२००४**
**पुणे दिनांकः-१३/१२ /२००४**

**प्रति,**
**मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,**
~~श्री. मंगेश मेमोरियल इंटर नॅशनल~~
~~स्कूल, बालाजीनगर दौंड जि. पुणे~~

**विषयः-** इंग्रजी व मराठी माध्यमाच्या 'कायम विनाअनुदानित' तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा / नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम /ज्यादा तुकडया / वर्ग उघडण्यास परवानगी देणे बाबत. (माध्यम- इंग्रजी )

**संदर्भ-१.** शासन पत्र क्रमांक व्हीएलएस-१००२/(१०००/२००२)/प्राशि-३ दि-२३/९/२००३ व समक्रमांक दिनांकः-१४ जानेवारी २००३

२. शासन पत्र क्रमांकः- व्हीएलएस-१००४ (२२५/०४) प्राशि-३ दिनांक - ८ मे २००४

वरिल विषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या ज्यादा/नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम / ज्यादा तुकडया / वर्ग जून २००३ पासून सन २००३ -२००४ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून कायम विना अनुदानित तत्वावर मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्री. मंगेश मेमोरियल इंटर नॅशनल स्कूल, बालाजीनगर दौंड जि. पुणे | इंग्रजी | इ-२री ते ८वी च्या एका वर्गास | नैसर्गिक | मंजूर |

**<u>अटी व शर्ती</u>**

१.शाळेस शासनाने विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायीक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहीजे.

२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतीक सुविधा तसेच शैक्षणिक व व्यसस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहीजे . सदर शाळेची स्वछतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केलीपाहीजे.

५. सदर मंजूर करण्यात येणऱ्या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही. याचौ खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६. सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थी संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.

७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रदद् करणेत येइल.

८.पट व उपस्थिती वाढविण्याचे अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

९. विहीत हमीपत्र रु.२०/- चे स्टॅम्प पेपरवर सादर करणेचे अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

१०. भविष्यात माध्यम बदलता येणार नाहीव भविष्यात अनुदानाची मागणी करणार नाही तसेच सदर वर्ग प्रत्यक्षात सुरू असतीलव राहतील या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

[illegible]

शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद,पुणे करिता

प्रतः- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१. प्रशासन अधिकारी/ग.शि.अ. , ~~पं.स. दौंड ता. दौंड जि. पुणे~~

२. सचिव/अध्यक्ष , ~~श्री. मंगेश मेमोरियल एज्युकेशनल सोसा. दौंड ता. दौंड~~

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिकाऱ्यांकडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

---

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**

१. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
४. मा. सचिव/अध्यक्ष,
श्री. मंगेश मेमोरियल एज्यु. सोसायटी,
दौंड, जि-पुणे.